मे 2025

# ‘वेध सृजन’

स्वअध्ययनातून भविष्यवेधी शिक्षणाकडे...

अंक क्रमांक

4



वेध परिवार, भारत

प्रेरणास्थान तथा
मार्गदर्शक :- श्री. नंदकुमार साहेब, महासंचालक मिशन मनरेगा,

संपादक :- श्री. निलेश घुगे, (मनरेगा,ओ.बी.सी.,एम.पी.एस.पी.मुंबई )

कार्यकारी संपादक :- श्री. प्रभाकर हिप्परगे, (केंद्र प्रमुख, लातूर )

संपादन सल्लागार :- रोहिणी विद्यासागर (प्राथमिक शिक्षिका)
जि. प. कें. प्रा. शाळा कुंभेफळ ता. जि. छ. संभाजीनगर

:- अशोक निकाळजे ( सहशिक्षक )
जि. प. उच्च प्राथ. शाळा आगरनांदुर. ता. गेवराई. जि. बीड .

संपादन सचिव :- प्रियंका पाटील (राज्य प्रशिक्षण कक्ष, इ.मा.ब.क.मंत्रालय मुंबई

संपादन सहाय्य :- अनिता राठोड -सहशिक्षिका
कै.गुरुदयालसिंग राठोड माध्यमिक आश्रमशाळा गराडा,
ता.कन्नड,जि.छत्रपती संभाजीनगर.

:- हर्षदा चोपणे (सहशिक्षिका)
जि. प. शाळा सिंधीवाढोणा ता- (झरी जामनी) जिल्हा यवतमाळ

:- गजाजन तुरारे (पदवीधर विषय शिक्षक)
जि. प. उच्च प्राथ.शाळा रांगणा.ता. वणी, जिल्हा यवतमाळ.

:- नितीन मेमाणे ( पदवीधर शिक्षक)
जि. प. प्राथ. शाळा पांडे, तालुका:- भोर, जिल्हा:-पुणे

:- ललित उदापुरे (वेध स्त्रोत, क्षमता बांधणी कक्ष, वाशीम )

:- दिपेश पुरोहित (शिक्षक )
शास.पूर्व मा. विद्यालय बोरसी , ता. डभरा जि. सक्ति,
छत्तीसगढ़

# वेधसृजन अंक पार्श्वभूमी ...

**प्रिय वाचक,**

गेल्या चार वर्षांपासून वेध हा समूह राज्य तसेच देशपातळीवर शिक्षणाचा प्रचार प्रसार करत परिणामककारक अध्ययन अध्यापन पद्धतीच्या वाटा धुंडाळत आहे. हे करत असतांना नेमके मूल शिकते करण्याचे मार्ग कोणते आहेत? शिक्षकांनी/ पालकांनी कोणते मार्ग अवलंबन करत मूल शिकते करायचे आहे? शिक्षकांनी शिकवायचे की मूले स्वतः शिकतील यासाठी योजना आखायच्या? या आणि अशा अगणित प्रश्नांच्या मुळाशी जाऊन ठोस असे धोरण वेधला मिळालंय. ते म्हणजे मुलांना शिकवायचे नाही तर ते स्वतः शिकतील याचे नियोजन  व्यवस्थापन आणि नेतृत्व करायचे. "शिकायचे कसे हे शिकणे" हा वेध विचारांचा गाभा आहे आणि हा विचार आता वैश्विक होत जात आहे. या वैश्विकीकरणाच्या प्रवासात वेध परिवाराचे सर्वेसर्वा वेध चे प्रेरणास्त्रोत महाराष्ट्र राज्याचे माजी शिक्षणसचिव आणि सध्याचे मिशन महासंचालक (मनरेगा) आदरणीय नंदकुमार सर यांच्यासोबत वेध चे संघटक श्री. निलेश घुगे आणि त्यांची संपूर्ण टीम शिक्षण क्षेत्रात सातत्याने चार वर्षापासून सक्रीय योगदान देत स्वयंचलित अध्ययन प्रणालीचा प्रचार प्रसार आणि जागरूकता निर्माण करत आहेत. आज महाराष्ट्र राज्य आणि राज्याबाहेरील अनेक शिक्षणप्रेमी वेधसोबत जोडले गेले आहेत. वर्ष २०२३ मध्ये राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्था महाराष्ट्र (SCERT) च्या माध्यमातून वेध समूहाने संशोधित केलेले प्रशिक्षण मॉड्यूल "अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन" हे राज्यातील प्रत्येक शिक्षकापर्यंत पोचलेले आहे. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून भविष्यवेधी शिक्षण प्रणाली च्या स्वः पातळीवर करावयाच्या ६ पायऱ्या स्विकारत मुलांना गतीने शिकण्यास प्रेरित करणारी एक साखळी तयार झालेली आहे. मुलांना शिकवायचे कसे हा प्रश्न आता संपलेला आहे आणि एक शाश्वत मार्ग राज्याचा शिक्षण विभागाला मिळालेला आहे. हे सर्व चित्र अत्यंत समाधानकारक आहे आणि आता हे समाधान फक्त वेध समूहापुरते किंवा या प्रक्रियेवर काम करणाऱ्या शिक्षकांपर्यंत सिमीत रहावे असे होऊ नये यासाठी तसेच तळगाळातील शिक्षकांना वैश्विक स्विकृती मिळवून देणे, त्यांच्या कामाचा प्रसार करणे, त्यांच्याकडून प्रेरणा घेत समविचारी स्वयंप्रेरित शिक्षकांची चळवळ उभी करणे यासाठी "वेध सृजन" हे अंक निर्मिती चा निर्णय घेतला आहे.

या अंकाच्या वैशिष्ट्यपूर्ण बाबी खालीलप्रमाणे असणार आहेत.

भविष्यवेधी शिक्षण पध्दतीच्या १,२,३,४,५,आणि ६ या  ६ पायऱ्या उपयोगात आणुन परिणाम मिळवणाऱ्या शिक्षकांचे अनुभव अंकाच्या माध्यमातून छापणे आणि प्रसारित करणे.

मूल शिकण्याच्या स्वयंचलीत पध्दतींचा प्रचार प्रसार करणे.

साध्या सोप्या भाषेत परिणामकारक अनुभवांची मांडणी करत इतर शिक्षकांना प्रेरित करणे.

वेधसृजन अंकाच्या माध्यमातून शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या घटकांना लेखक होण्यासाठी त्यांचे विचार मांडण्यासाठी हक्काचे व्यासपिठ मिळवून देणे.

लिहिते होण्यासाठी संधीची समानता उपलब्ध करून देणे.

केवळ शिक्षक च नव्हे तर पालक, शालेय विद्यार्थी यांच्यात लेखन प्रेरणा जागृत करणे.

विद्यार्थी, पालक, शिक्षणप्रेमी यांना त्यांचे विचार अनुभव लेखनाची संधी देणे.

राज्य, राज्याबाहेरील शैक्षणिक अनुभवांचे लेखन करणाऱ्या लेखकांना जोडणे आणि लिखित स्वरूपातील अनुभवांची देवाणघेवाण करणे.

लेखन संस्कृती रुजवणे.

अशा अनेक वैशिष्ट्यपूर्ण बाबींचा ध्यास घेत "वेध सृजन" अंक आपणा सर्वांच्या सेवेसाठी तसेच सहयोग आणि सहकार्याने उपलब्ध होत आहे याचा विशेष आनंद होत आहे.


वाचक या अभिनव अंकातील प्रेरक लिखित अनुभवांचा उपयोग आपल्या शैक्षणिक कार्यक्षेत्रत उपयोग करतील आणि मुलांच्या शिकण्यात योगदान देतील असा विश्वास वाटतो.

वेधसृजन अंक शिक्षण क्षेत्रात अतुलनिय योगदानाच्या पातळीवर काम करेल या विश्वासासह आपणा सर्वांना शुभेच्छा! आणि लिहिते होण्यास्तव आग्रह 🙏

**धन्यवाद !**

**सचिव**
**वेधसृजन अंक**

# शुभेच्छा संदेश



**मा. श्री. नंदकुमार**
**मिशन महासंचालक (मनरेगा)**

जगातील मुलांना शिकते करण्यासाठी वेध PLC मागील अनेक वर्षांपासून अतिशय उत्तमरित्या काम करत आहे. मला वाटते जगातील ही एकमेव PLC असेल जी दररोज रात्री zoom च्या माध्यमातून एकत्र येऊन मुलांच्या शिकण्याबाबत चर्चा, विचारविनिमय आणि शैक्षणिक धोरण आखते. मी शिक्षण सचिव असताना राज्यातील अनेक शिक्षकांच्या संपर्कात आलो. त्यातील काही शिक्षक आजही सोबत आहेत आणि मला सांगतांना आनंद वाटतो की, मी सुद्धा त्यांच्यासोबत वेधवर्क टीमच्या चर्चेत सहभागी होत असतो. माझा या सर्वांसोबत शिकण्याचा प्रवास अविरतपणे सुरू आहे. विविध विभागांच्या महत्वपूर्ण पदांवर माझी नियुक्ती असतांना मी शिक्षणासाठी, शिक्षकांसाठी कसे काय वेळ काढू शकतो? असा प्रश्न मला अनेकजण विचारतात. जगातील प्रत्येक मूल शिकण्याच्या प्रक्रियेत माझे स्वतःचे योगदान देता यावे या उदात्त हेतूने मी हे सगळं अथकपणे करतोय आणि करत राहणार आहे. वेधचा प्रवास मागे वळून पाहता एक सहज एकमेकांची भेट व्हावी, शैक्षणिक गप्पा व्हाव्यात या अनुषंगाने सुरू केलेला हा समूह आज एका यशस्वी PLC च्या रूपात राज्य आणि राज्याबाहेर सुद्धा काम करत आहे. प्रशिक्षण क्षेत्रातील वेध चे योगदान अमूल्य आहे. अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या माध्यमातून वेधची विचारशैली आणि कार्यपध्दती राज्याच्या प्रत्येक शिक्षकापर्यंत पोहचविणे हे वेधचे सर्वात मोठे यश म्हणावे लागेल आणि याचीच फलश्रुती म्हणजे राज्यातील अनेक शिक्षक भविष्यवेधी शिक्षण प्रक्रियेच्या ६ पायऱ्यांचा उपयोग करत मुलांना शिकते करत आहे. या शिक्षकांचे अनुभव अत्यंत प्रेरणादायी आहेत आणि हे प्रेरणादायी अनुभव आता स्वतंत्र "वेध सृजन" या अंकाच्या माध्यमातून लिखित स्वरूपात उपलब्ध होत आहेत. निलेश घुगे संपादक म्हणून जबाबदारी सांभाळणार असुन प्रियंका अहिरराव, प्रभाकर हिप्परगे, रोहीणी विद्यासागर, अशोक निकाळजे आणि त्यांची संपूर्ण टीम या अंकासाठी जबाबदारी घेत आहेत. वेधसमूहाने घेतलेला निकाळजे हा निर्णय अतिशय कौतुकास्पद आहे. या निमित्ताने वेधस्त्रोत यांनी सर्वप्रथम लिहिते व्हावे आपले जास्तीत जास्त अनुभव लिखित स्वरूपात मांडावेत, रात्रीच्या चर्चेत गप्पाच्या माध्यमातून इतरांचे अनुभव ऐकावेत ते जाणकारांनी पुस्तकाच्या भाषेत लिहून काढावेत. जिल्हा गटातील सदस्यांना लिहिण्यासाठी प्रोत्साहित करावे. हे सर्व करत असतांना एक बाब विचाराधीन असावी ती म्हणजे आपण मांडत असणारे विचार भविष्यातील मूल घडवण्यासाठी प्रेरक असावेत आणि ते अनुभव वाचून सर्वसामान्य शिक्षकाला प्रेरणा मिळावी. तुमच्या लेखनातून Learning to learn हे तत्व रुजावे. शिक्षकांना वर्गपातळीवर भेडसावणाऱ्या समस्या सोडवण्यास मदत व्हावी. लेखन परिणामाधारित असावे. या अपेक्षांसह मी "वेध सृजन" या अंकासाठी शुभेच्छा देतो.

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | लेखाचे नाव | ले ख क | पा न क्र मां क |
|---|---|---|---|
| 1 | भविष्यवेधी शिक्षण वेध परिवाराचे लक्षण | श्रीमती जयश्री सरके | 1 |
| 2 | निपुण महाराष्ट्र एक प्रेरक चळवळ | श्रीमती रोहीणी पिंपरखेडकर | 4 |
| 3 | जाऊ भाषांच्या गावा | श्रीमती मिनाक्षी जगताप | 7 |
| 4 | वेध परिवारातील माझा प्रवास व सहवास दाखवली भविष्यवेधी शिक्षणाची वेगळी वाट | विद्या देशमुख / मेमाणे | 9 |
| 5 | उपक्रमांकडून गुणवत्तेकडे | अनुराधा केळकर | 12 |
| 6 | भविष्यवेधी शाळा- कविता | योगेश सोसे | 14 |
| 7 | वेध प्रकाशन | | 15 |
| 8 | छोटा बच्चा समझे है क्या ? | श्रीमती उमेश्वरी साहु | 16 |
| 9 | मुलांच्या मनाशी घट्ट नाते जोडले की,शिकण्याची आवड अंत:करणापासून निर्माण होते | तृप्ती तोडकर | 18 |
| 10 | भविष्यवेधी शिक्षण संस्कृती | रागिणी वाडेकर | 21 |
| 11 | भविष्यवेधी वेध कृती वाढवतात इंग्रजी शिक्षणाची गती | प्रिया नितिन उपासनी | 25 |
| 12 | परिचय-वेध परिवाराचा | | 27 |



# भविष्यवेधी शिक्षण, वेध परिवाराचे लक्षण,



• **जयश्री बबन सरके- मारकड.**


**नमस्कार,**

माणूस जन्माला येतो तेव्हापासून त्याला जीवनात अडचणी ह्या येतातच, त्याप्रमाणे मला शंभर टक्के वर्ग प्रगत करण्यात खूप अडचणी येत होत्या. मला असे वाटे की मी शिकवण्यात कमी पडते की काय? माझी मुले अभ्यासात कमी पडतात याची मला सारखी खंत वाटत असे. असे असताना जानेवारी 2024 मध्ये अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन हे प्रशिक्षण झाले, आणि प्रशिक्षणात सांगितल्याप्रमाणे मी माझी पूर्वीची शिकवण्याची पारंपरिक शिक्षण पद्धत बदलून मुलांना आव्हाने देऊ लागले व त्या आव्हानातून माझ्या वर्गात एक जादू घडायला लागली ही जादू गाण्याच्या भाषेत सांगायचे झाल्यास मी म्हणेन की भविष्यवेधी शिक्षणाची गाडी, आव्हानांचा धूर सोडी. प्रशिक्षणानंतर मी माझ्या वर्गात भविष्यवेधी शिक्षण प्रणालीचा अवलंब करणे सुरू केले.

२१ व्या शतकातील कौशल्य

१) क्रिटिकल थिंकिंग
२) क्रिएटिव्ह थिंकिंग
३) कोलॅबोरेशन
४) कम्युनिकेशन
५) कॉन्फिडन्स
६) कम्पॅशन

या 6c वर मी काम करण्यास सुरुवात केली.



या 6c वर काम करत असताना मला अनेक अडचणी ही येऊ लागल्या, मात्र जिथे जिथे अडचणी येतील तेथे तेथे मला वेध समूहाचे मार्गदर्शन मिळत गेले. मी तर म्हणेल," सर्व समस्यांचा छेद त्याचे नाव वेध" सर्वप्रथम मी विद्यार्थ्यांना दिलेले आव्हान पूर्ण केल्याने विद्यार्थ्यांच्या सेल्फी विथ सक्सेस काढू लागल्याने सतत गैरहजर राहणारी माझी विद्यार्थिनी वेदिका आपल्या मित्र-मैत्रिणींचा ग्रुप वर आलेल्या सेल्फी पाहून माझाही सेल्फी आला पाहिजे म्हणून नियमितपणे शाळेत येऊ लागली.

आव्हाने दिले की मुले स्वतः शिकण्यास प्रेरित होतात याचा अनुभव मला आला. मी विद्यार्थ्यांना वर्गातील रनिंग बोर्ड मुलांना लिहिण्यासाठी रिकामा ठेवला तर मुले स्वतःहून आपल्याला जे येत आहे ते त्या फळ्यावर रेखाटू लागली व एकमेकांचे पाहून स्वतः शिकू लागली. तसेच मुलांच्या शिक्षणामध्ये लर्निंग इंटरव्हेशन ही एक खूप महत्त्वाची पायरी आहे, यामध्ये मी अनेक वेळा वर्गामध्ये ग्रुप लर्निंग, पियर लर्निंग चा उपयोग केल्याने माझा वरद सपकाळ हा विद्यार्थी अजिबात अभ्यास न करणारा परंतु पिअर लर्निंग मुळे लेखन वाचन करू लागला. याचा आनंद त्यालाच नव्हे तर मला आणि पालकांनाही आहे. ग्रुप लर्निंग मुळे माझे विद्यार्थी जेवणाच्या सुट्टीमध्ये जेवण करून ग्रुप लर्निंग



मध्ये आव्हाने पूर्ण करताना दिसू लागली.

भविष्यवेधी शिक्षणासाठी मी जे वेगवेगळे उपक्रम राबवत आहे त्यासाठी त्या उपक्रमात अगदी मुले अतिशय झपाटल्यासारखे प्रतिसाद देतात . या आठवड्यातीलच उदाहरण अनुभव म्हणुन सांगते.

मुलांच्या मदतीने दुसरीचा अभ्यासक्रम पूर्ण झाला असल्याने मी त्यांना तीन अंकी संख्या कशा सुरू होतात हे सांगितले जेवणाच्या सुट्टीनंतर 100 ते 999 पर्यंत संख्या लिहिण्याची आव्हान दिले, मुले आव्हान पूर्ण करत असताना छोटी सुट्टी झाली तर मुले म्हणू लागली 'आम्हाला बाहेर जायचे नाही' किंवा खेळाच्या तासाला मी "खेळायला चला" म्हटलं तर आज आम्ही खेळायला ही नाही जाणार, मी दिलेले आव्हान पूर्ण करण्यात मुले इतके दंग झाली की जणू आव्हान पूर्ण केल्याशिवाय खेळही नाही असेच जणू त्यांनी ठरवून टाकले व शाळा सुटल्यानंतरही घरी जाऊन वेगवेगळ्या वेळात आव्हान पूर्ण करून मला ग्रुप वर पाठवले. ही आहे भविष्यवेधी शिक्षणाची किमया.



भविष्यवेधी शिक्षणाचा विचार करता सध्याचे योग हे तंत्रज्ञानाचे योग आहे या युगात चंद्रयान प्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्याला जीवनात चंद्रावर पोहोचायचे आहे त्यासाठी शिक्षणात तंत्रज्ञानाचा वापर करणे गरजेचे आहे परंतु जशा नाण्याला दोन बाजू असतात त्याप्रमाणे प्रत्येक गोष्टीला फायदे तोटे हे असतातच, मात्र मोबाईलचा दुष्परिणाम होणार नाही याची काळजी घेऊन मी वर्गात तंत्रज्ञानाचा वापर करायला सुरुवात केली. यामध्ये विद्यार्थी स्वतः माझा मोबाईल घेऊन कविता ऐकणे, काही इंग्रजी शब्दांचे अर्थ शोधणे, शैक्षणिक व्हिडिओ अशा गोष्टी करत असतात. त्याचप्रमाणे विद्यार्थी स्वतः टिव्ही सुरु करून त्यावरील व्हिडिओ पाहून वर्कशीट व दीदी का सवाल सारखे प्रश्न सोडवतात, पॅरेंट्स ग्रुप वर व्हॉइस टायपिंग करून मला अभ्यासा विषयी अडचणी विचारतात. इतकेच नव्हे तर आयुष मौर्य हा विद्यार्थी घरगुती कारणामुळे काही दिवस यूपीमध्ये गावाकडे गेला होता, तर त्याने पुस्तकाची पीडीएफ डाऊनलोड करून अभ्यास चालू ठेवला. हे सर्व काही कल्पनेच्या पलिकडले माझ्यासोबत घडत आहे असे मला वाटतंय. माझ्या मुलांच्या काळजीपोटी त्रस्त असणारी मी आता पूर्णतः बदलले आहे.

आणखी एक गोष्ट मला अभिमानाने सांगावीशी वाटते ती म्हणजे मी वर्गात इंग्रजीच्या वेध कृतींचा सराव घेत असल्याने माझ्या वर्गातील शंभर टक्के विद्यार्थी My Self विषयी सांगतात. अनेक विद्यार्थी 100 ते 150 शब्द सांगतात तर काही विद्यार्थी इंग्रजी वाक्य वाचन करतात. एकमेकांशी छोट्या छोट्या वाक्यातून संवाद साधण्याचा प्रयत्न करतात. घरी गेल्यावर आई-वडिलांशी बोलताना इंग्रजी शब्दांचा वापर करतात त्यामुळे माझे मूल इंग्रजी बोलू शकते या विश्वासाने पालकही आनंदित होतात.


माझ्या विद्यार्थ्यांचे भविष्य वेधी शिक्षणाचे हे सर्व परिणाम पाहून यावर्षी इंग्रजी माध्यमाचे दोन विद्यार्थी माझ्या वर्गात दाखल झाले आहेत.

वेध परिवाराच्या मदतीने माझा संपूर्ण वर्ग भविष्यवेधी शिक्षणाच्या दिशेने प्रगती करत आहे.त्यासाठी मी स्वतः वेध परिवाराचे शतशः आभार.





**जयश्री बबन सरके- मारकड**
**पी.एम.श्री. जि. प. प्रा. शाळा भिगवण,**
**ता. इंदापूर. जि. पुणे.**
**संपर्क 7350104752**





# निपुण महाराष्ट्र कृती कार्यक्रम एक प्रेरक चळवळ



- **रोहिणी विद्यासागर पिंपरखेडकर**

निपुण महाराष्ट्र श्रुतलेखना संदर्भात वर्गात घेतलेल्या कृती

**स्तर 4 :-** श्रुतलेखन करताना वर्णमालेतील सर्व अक्षरांच्या ध्वनीचा उच्चार ऐकून अक्षरे लिहितो.

**स्तर 7:-** श्रुत लेखन करताना वर्णमालेतील सर्व अक्षरे स्वरचिन्ह युक्त व जोडाक्षरयुक्त शब्द लिहितो.

**स्तर 8:-**दोन ते तीन शब्दांची सोप्या जोडाक्षरांची एक ते दोन सोपी वाक्य पाहून लिहितो.

**सुलभक :-** शिक्षक आणि पालक

**मदत:-** प्रगत मुलांची मदत घेऊन त्याखालील स्तरावर असलेल्या विद्यार्थ्यांसाठी जोडाक्षरयुक्त शब्द आणि साधे शब्द असलेले उतारे तयार करणे यासाठी वर्गातील नास आणि पिसा लेवल चे विद्यार्थी.

कृती:-

वर्गातील काही विद्यार्थ्यांना स्वर-चिन्ह असलेली अक्षरे आणि जोडाक्षरे ऐकून लिहिण्याची समस्या आहे. त्यासाठी फलकावरती स्वर, त्या स्वरांखाली स्वरांचे अवयव असे लिहून ठेवले. त्यानंतर त्याखाली प्रत्येक अक्षराला य हेअक्षर जोडल्यानंतर तयार होणारी जोडाक्षरे लिहून ठेवली.

आता आम्हाला वेगवेगळ्या अक्षरांची गरज पडणार होती.

मग मुलांना सूचना केली की प्रत्येकाने आपल्या नावातील पहिले अक्षर सांगावे आणि ते सर्व मुलांनी लिहून काढावे. त्यांनी लिहिलेले अक्षर बरोबर आहे की नाही हे तपासण्यासाठी शिक्षक फळ्यावर ते अक्षर लिहून दाखवतील. जसे भक्ती या मुलीच्या नावातील 'भ' अक्षर, तनुक्षा या मुलीच्या नावातील 'त' अक्षर. असे प्रत्येक मुलाच्या नावातील अक्षर घेतले. मग त्या अक्षरांना अवयव जोडायचे होते. वर्गामध्ये स्वरांवरून नावे असलेली काही मुले आहेत. जसे आराध्या, आरुषी, अंजली, इंद्र, ईश्वरी, उमेश इत्यादी.

आता 'त' अक्षराला ईश्वरीचा ई जोडलातर 'ती' अक्षर मिळते. आराध्याचा आ जोडलातर 'ता'अक्षर मिळते.

असे मुलांना सांगताच मुले स्वतः देखील वेगवेगळी अक्षरे सांगू लागली आणि त्याला स्वरचिन्ह जोडत कोण कोणती अक्षरे तयार होतात हे देखील सांगू लागली.(मुलांचे स्वतः शिकण्यास प्रेरित होणे:- अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन प्रशिक्षणातील पहिली बाब.) त्यानंतर मी मुलांना वेगवेगळे शब्द तोंडी सांगितले आणि फळ्यावर असलेले स्वर, त्यांचे अवयव, फळ्यावर लिहून ठेवलेले जोडाक्षर तसेच मुलांच्या नावातील अद्याक्षर यातून तयार होणारे शब्द मुलांनी ऐकून लिहिले.





आणि त्यांनी लिहिलेले शब्द बरोबर आहे की नाही हे पाहण्यासाठी मी फळ्यावरती हे शब्द लिहून ठेवले आणि मुलांना स्वतःच तपासायला सांगितले. यात बऱ्याच मुलांचे शब्द बरोबर आलेले होते. आणि आकलन गती कमी असणाऱ्या मुलांसाठी ते शब्द लिखित स्वरूपामध्ये फलकावर उपलब्ध असल्यामुळे त्यांना देखील त्या शब्दांबद्दल जाणून घेणे सोपे जात होते आणि पाहून पाहून ते शब्द मुले लिहीत होती. ( यात शब्द पाहून लिहिणे हा स्तर देखील कव्हर होताना दिसत होता.)

असे बरेच शब्द तयार झाल्यानंतर त्यातून छोट्या दोन दोन शब्दांच्या कविता किंवा उतारे लिहिण्याचे आव्हान मी मुलांना देऊन टाकले.( मुलांना शिकण्यासाठी आव्हान देणे. अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन प्रशिक्षणातील दुसरी बाब)

मुलांनी छान छोटे छोटे उतारे तयार केले.

हे उतारे तयार करत असताना विरामचिन्हांचा योग्य वापर करण्यासंदर्भात त्यांना सूचना देण्यात आल्या. मग मुलांनी पुन्हा विरामचिन्हांचा वापर करून उताऱ्याचे लिखाण केले. ( यात देखील विद्यार्थी सोपे शब्द व जोडाक्षरयुक्त शब्द असलेली छोटीछोटी वाक्य असलेले सहा ते आठ ओळींचे परिच्छेद मुलांनी तयार केले. हा देखील एक अध्ययन स्तर प्राप्त होताना दिसला.)





त्यानंतर मुलांना हे शब्द, उतारे जोडीने गटात वाचण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आले.

आणि वर्गात वाचन आणि लेखन प्रक्रिया हातात हात घालून पुढे जाताना दिसू लागली.

यातून वाचनाच्या स्तरांमध्येदिलेले विविध स्तर साध्य करण्यासाठी आपोआपच चालना मिळू लागली.

जो विद्यार्थी ज्या स्तरात आहे त्या स्तरावरून पुढे जाण्यासाठी मुलांनी मुलांसाठी तयार केलेले साहित्य वर्गातच उपलब्ध होत असल्याचा वेगळाच आनंद आम्हाला मिळाला.

स्तर क्रमांक 15:- अपरिचित मजकुरातील चार ते पाच सोप्या शब्दांनी तयार झालेली लहान वाक्य अचूकपणे विरामचिन्हासह आरोह-अवरोहंसह योग्य गतीने वाचतो.

या स्तरासाठी विद्यार्थ्यांना प्रभावी वाचन कसे असावे याचे प्रात्यक्षिक स्वतः करून दाखवले.

यात दररोज पाच मिनिटे शिक्षक स्वतः पाठ्यपुस्तकातील विविध पाठ त्यातील विरामचिन्हांच्या वापरासह योग्य आरोहांसह आणि भावना ओतून कसे वाचन करावे याबद्दल मुलांसोबत चर्चा केली. जसे- एक होता शेतकरी. तो शेतात खूप कष्ट करायचा. यामध्ये वाचन करत असताना खूप हा शब्द कशा पद्धतीने उच्चारावा म्हणजे शेतकऱ्याची भरपूर कष्ट करण्याची भावना ऐकणाऱ्या

पर्यंतपोहोचेल इत्यादी बाबी त्यांना समजून सांगितल्या.

वाचन करत असताना उच्चारल्या जाणाऱ्या शब्दांमधून व्यक्त होणाऱ्या भावना जसे राग, द्वेष, प्रेम, प्रश्न, उत्सुकता, वैताग अशा वेगवेगळ्या भावना वाचनातून व्यक्त करण्यासाठी आपल्या आवाजाचा टोन कसा चेंज होतो याचेही प्रात्यक्षिक मुलांना करून दाखवले. कोणती भावना व्यक्त होताना कोणती चिन्हे वापरली जातात जसे पूर्णविराम, स्वल्पविराम, प्रश्नचिन्ह, उद्गारवाचक चिन्ह, अवतरण चिन्ह एकेरी आणि दुहेरी, अशा सर्व बाबींची त्यांना माहिती दिली. तेव्हा वर्गातील काही विद्यार्थी मंथन परीक्षेमध्ये आम्हाला अशा चिन्हांवर प्रश्न विचारलेले होते याबद्दल माहिती सांगू लागली. ( मुले विश्लेषण करताना दिसली.)

प्रकट वाचन करत असताना अशा प्रत्येक टप्प्यावर मुलांसोबत दिलखुलास चर्चा केल्यामुळे मुलांना वाचनातून कोणत्या गोष्टी अपेक्षित आहेत हे समजले.

याचा परिणाम त्यांच्या समजपूर्वक व योग्यगतीने वाचन प्रक्रिया विकसित होण्यावर होताना दिसत आहे. वर्गातील प्रत्येक मूल वाचन करून दाखवण्यासाठी उत्सुक दिसत आहे.

या गोष्टी करत असताना वर्गात इतक्या गमती जमती घडत आहेत की मुलांना शिकणे शिकवणे आणि शाळेत उपस्थित राहणे हे खूपच आवडायला लागले आहे. सकाळी सात वाजता असलेल्या शाळेत दाटीवाटीने बसलेले विद्यार्थी पाहणे हा दुर्मिळ योग यानिमित्ताने माझ्या नशिबी आला याचा मला प्रचंड आनंद आहे. घरी गेल्यावर देखील पालकांच्या मदतीने मुले या क्रिया करत असल्याचे त्यांच्या एकूण प्रतिक्रियांवरून लक्षात येत आहे.

या पद्धतीने वर्गात आनंददायी उत्साहवर्धक आणि शिकण्यास पूरक वातावरण असेल तर 'झोपून' राहण्यापेक्षा 'निपुण' होण्यासाठी प्रत्येक मूल आनंदाने शाळेत येईल असे वाटते.

**दि 25 मार्च 2025**

**( लेखातीलअनुभव 17 मार्च 2025 ते 25 मार्च 2025 या काळातील आहेत.)**

**मुलांनीतयार केलेले छोटे छोटे उतारे खालील प्रमाणे आहेत.**

**उतारा क्र.** 1

काही मुली होत्या. त्यांनी साड्या घातल्या.साड्यावर वेण्याही घातल्या. नटून शाळेत गेल्या. सर्वांच्या पाया पडल्या. शाळेत मॅडमच्या पाया पडल्या.सर्वांनी त्यांना आशीर्वाद दिला.त्यांनी शाळेत खूप भारी डान्स केला. सरांनी त्यांना बक्षीस दिले. त्यांना आनंद झाला. त्यांचे खूप फोटो काढले. ते आनंदाने घरी गेले.

**उतारा क्र. 2**

पक्या आणि सख्या मित्र होते. त्यांनी एकदा आग्या मोहोळ पाहिले. त्यांनी रघ्या आणि सच्याला सांगितले. मग त्यांनी मोहोळ तोडले. मग त्यांनी प्लेट आणली. सर्वांना बोलावले आणि मोहोळ खाल्ले. ते आनंदात घरी गेले.

**उतारा क्र 3**

एक होता माकड. तो खात होता पापड. पापड घेऊन तो चढला झाडावर. त्यांनी कुत्र्याला पाहिले. पापड हातातून निसटले. कुत्रे पापड घेऊन पळाले. माकडाने झाडाची फांदी तोडली. आणि झाडावरून झाडावर उड्या मारल्या. कुत्र्याने पापड लपवून ठेवला. ते माकडाने उंच झाडावरून पाहिले.



# जाऊ भाषांच्या गावा....


- मिनाक्षी पिसे - जगताप




**नमस्कार....**

विद्यार्थ्यांची अध्ययन प्रक्रिया अधिकाधिक गतिशील, सुलभ आणि आनंदी होण्यासाठी नवनवीन कल्पनांचा शोध घेणे हा जणू माझा छंदच. एकदा youtube वर असेच वेगवेगळे उपक्रमांचे व्हिडिओ पाहत असताना वाबळेवाडीच्या शाळेतील विद्यार्थी परदेशातील भाषा सुद्धा अतिशय आत्मविश्वासाने बोलताना पाहिले आणि वाटले की ते करू शकतात तर आपण का नाही ?

काही दिवसांपूर्वीच ' अध्ययन-अध्यापन प्रक्रियेचे व्यवस्थापन' हे प्रशिक्षण झालेले होते.त्यामुळे विद्यार्थ्यांना आव्हान दिले तर विद्यार्थी स्वयं प्रेरणेने शिकतात यावर माझा दृढ विश्वास होता. मागील वर्षी म्हणजेच सन 2023-24 मध्ये माझ्याकडे इयत्ता सहावीचा वर्ग होता. सर्वप्रथम मी विद्यार्थ्यांना स्वतःबद्दलची माहिती मराठीतून सांगायला सांगितले. राजरत्नने माहिती मराठीतून सांगितली. त्यानंतर नवीन आणि प्रसाद ने स्वतःबद्दलची माहिती हिंदी आणि इंग्रजीतून सांगितली मग विद्यार्थ्यांना या तीन भाषेव्यतिरिक्त वेगळ्या भाषेमध्ये माहिती सांगण्याचे आव्हान देण्यात आले. थोडावेळ वर्गामध्ये अतिशय शांतता पसरली. तेवढ्यात मोहिनी म्हणाली, 'मॅडम मी लमाणी भाषेत माझ्याबद्दलची माहिती सांगते'. मोहिनीने लमाणी भाषेत स्वतःबद्दलची माहिती सांगितली आणि वर्गात हास्याचे फवारे फुटायला सुरवात झाली.

मातृभाषेमध्ये बोलताना मोहिनीच्या चेहऱ्यावरून आनंद अगदी ओसंडून वाहत होता.मोहिनीच होतयं न होतयं तोपर्यंत रिशुकुमारने एकदम उत्साहाने भोजपुरी माहिती सांगायला सुरुवात केली. वर्गातील विद्यार्थी भाषेच्या  गमती-जमती अगदी तल्लीन होऊन अनुभवत होते. तेवढ्यात काही



काही मुलींनी  एकच गलका केला 'मॅडम ही कावेरी ना...कन्नड  खूप छान बोलते.. तिला सांगा ना.. तिची भाषा बोलायला प्लीज.. प्लीज'. कावेरीचे बोलून होईपर्यंत कोणीही हसणार नाही या अटीवर कावेरी थोडीशी लाजत, बिचकत कन्नड मधून बोलायला तयार झाली. कावेरीचे पूर्ण बोलून होईपर्यंत माझ्यासहित संपूर्ण वर्गाने स्वतःचं हसू आवरलं पण त्यानंतर मात्र आम्ही सगळे अगदी पोटभर हसलो.

यानंतर मला एका गोष्टीची नक्की खात्री झाली होती की, भाषांची  ही गाडी  आता अगदी सुसाट धावणार. विद्यार्थ्यांपुढे आता आव्हान होते आपल्याला माहित नसलेल्या भाषा शिकण्याचे. इतर भाषा शिकण्यासाठी विद्यार्थ्यांनी  गुगल ट्रान्सलेटर हे  ॲप नेमके कसे वापरायचे? हे व्यवस्थित समजून घेतले आणि सुरू झाला एक अनोखा, सुंदर आणि अविस्मरणीय असा, 'प्रवास भाषांचा.....' अगदी थोड्याच कालावधीत योगिता पंजाबीमध्ये ,सनी बंगालीमध्ये ,ऋतुजा तामिळमध्ये, गायत्री संस्कृतमध्ये, जान्हवी व आयेशा तर चक्क जापनीज आणि फ्रेंच सारख्या परकीय भाषांमध्ये अतिशय आत्मविश्वासाने स्वतःबद्दलची माहिती सांगू लागल्या. वर्गातील इतर विद्यार्थीही कधी गुगल ट्रान्सलेटर वापरून तर कधी एकमेकांच्या मदतीने वेगवेगळ्या भाषा शिकण्यात कधी हसत-खेळत रंगून गेले हे मलाही समजले नाही.

जगभरातील नवनवीन भाषांच्या गावी जाण्याचा हा आनंददायी  प्रवास अनुभवल्यानंतर मला खऱ्या अर्थाने श्रम निमपट ,परिणाम दुप्पट व आनंद तिप्पट' याचा  नेमका अर्थ गवसला.










**मिनाक्षी पिसे - जगताप**
कै.ह.भ.प.सिताराम देवकर प्राथमिक विद्यालय,
म.न.पा. शा. क्र. 170 मुलांची,कळस,पुणे-15
संपर्क क्रमांक - 9119502366

# ' वेध परिवारातील माझा प्रवास व सहवास, दाखवली भविष्यवेधी शिक्षणाची वेगळी वाट'.


- **विद्या बबनराव देशमुख**
**(विद्या नितीन मेमाणे)**




**नमस्कार,** मी श्रीम.विदया बबनराव देशमुख-मेमाणे शाळा:-झिंजूरकेवस्ती (जुनी), तालुका:-पुरंदर,जिल्हा. पुणे

'शिक्षण हे केवळ ज्ञानार्जनाचे साधन नसून ते व्यक्तिमत्व विकासाचे व समाज परिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे.' वेध परिवाराच्या माध्यमातून मी या परिवर्तनाची साक्षीदार आणि भागीदार झाले.

सगळ्यात पहिल्यांदा मी तुम्हांला वेध परिवाराशी कशी जोडले गेले हे सांगणार आहे. गेल्या वर्षी लोणावळा या ठिकाणी माननीय महामहीम राज्यपाल, शिक्षक आयुक्त,मा. नंदकुमार साहेब, मा. वारे सर यांच्या उपस्थितीत वेध संमेलन झाले. त्या वेध संमेलनाला मी 2 दिवस उपस्थित राहिले. त्यामागे एकच कारण होते, मला सपना मानकर-वसे मॅडम यांना भेटून त्यांचे विशेष आभार मानायचे होते,कारण माझ्या एका वैयक्तिक अडचणीमध्ये त्यांनी मला खूप अनमोल मदत केली होती. त्यांचे आभार मानायला मी नागपूरला कधी कशी व व्यस्त धावपळीतून कशी जाणार ? सपना मॅडम या वेध संमेलनाला येणार होत्या. माझे पती या वेध संमेलनाला जाणार होते, त्यामुळे मी ही त्यांच्याबरोबर वेध संमेलनाला गेले,कारण फक्त सपना मॅडम यांना भेटायचे होते वेध परिवारबाबत मला काहीही माहित नव्हते.वेध संमेलनात आल्यानंतर तीन दिवसाच्या या संमेलनाने मला एक नवी दिशा मिळाली.

या सर्व लोकांचे काम करण्याची पद्धत,ते समाजासाठी देत असलेल्या त्यांचा बहुमूल्य वेळ, मूल शिकण्यासाठी वापरत असलेल्या नवनवीन पद्दती, जगातील प्रत्येक मूल शिकले पाहिजे यासाठीची त्यांची धडपड,वसुधैव कुटुंकम या विचाराने प्रेरित झालेली आणि सर्वांच्या प्रति त्यांचा असलेला आदरभाव पाहून मी अक्षरशः भारावून गेले. ते करत असलेले काम पाहून आपणही यांच्यासारखे काहीतरी करावे असे वाटू लागले आणि मी वेध परिवाराच्या रोजच्या ऑनलाईन मिटींगला जॉईन होऊ लागले अशा प्रकारे मी वेध परिवाराचा एक भाग बनले.



आपल्या शाळेमध्येही मी काहीतरी वेगळं करावं,हा विचार मी करू लागले. त्यातच सपना मॅडम यांच्याशी बोलत असताना त्या करत असलेल्या कामाची माहिती मिळाली. त्या त्यांच्या विद्यार्थ्यांना जापनीज भाषा बोलायला शिकवत आहेत हा वेगळा विचार मनाला खूप आवडला. वेध संमेलनातही माननीय नंदकुमार साहेबांनी जेव्हा सर्व शिक्षकांना विचारले की उपस्थितांपैकी कोण कोण शिक्षक परकीय भाषांवर आपल्या शाळेमध्ये काम करत आहेत. तेव्हा जे शिक्षक यावर काम करत होते त्यांनी दिलेली उत्तरे ऐकूनही मी प्रेरित झाले.







सुरुवातीला याची सुरुवात कशी करावी? हे काहीच कळत नव्हते.मग सपना मॅडम यांच्याशी फोनवर बोलल्यानंतर त्यांनी गुगल ट्रान्सलेटर,डीओ लिंगो या ॲपबद्दल व तो कसा करावा याची माहिती सांगितली. त्यानंतर लगेचच अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन याचे प्रशिक्षण लागले. हे प्रशिक्षण चालू असताना यामध्येही जागतिक दर्जाच्या भविष्यवेधी शिक्षणाबद्दल माहिती मिळाली. यामध्येही भविष्यवेधी शिक्षणाच्या 6 पायऱ्यांचा उपयोग करून कमी श्रमामध्ये अधिक परिणाम मिळवू शकतो याची कल्पना आली. यामध्ये


1)मुलांना स्वतः शिकण्यास प्रेरित करणे.
2)मुलांना शिकण्यासाठी आव्हान देणे.
3)शिकण्याची गती वाढवण्यासाठी गट अध्ययन तसेच विषय मित्र शिक्षण या पद्धतीचा उपयोग.
4) मुलांच्या जिज्ञास वृत्तीचा सन्मान करणे.
5) शिकण्याच्या प्रक्रियेत तंत्रज्ञानाचा वापर करणे.
6) मुलांनी स्वतःची शिकण्याची गती वाढवणे.

या भविष्यवेधी शिक्षण पद्धतीचा सहा पायऱ्यांचा उपयोग करून घेण्याचे मी ठरवले.तंत्रज्ञानाचा वापर करून मुलांना आपल्या स्वतःलाही नवनवीन माहिती मिळू शकते याचा आत्मविश्वास माझ्यात निर्माण झाला. मुलांना आपल्याला जपानी भाषा शिकायची आहे हे सांगितल्यावर त्यांना हे खूपच वेगळे वाटले. पालकांनी सुद्धा आनंद व्यक्त केला. आपण हे शिकायचे कसे? असा प्रश्न मुलांना पडला. मग मी त्यांना गूगल ट्रान्सलेटर व डिओ लिंगो अँप कसे वापरायचे हे शिकवले. व मुलांनी ही भाषा शिकायला सुरुवात केली. यामध्ये सगळ्याच मुलांना घरी मोबाईल उपलब्ध होत नव्हते. मग त्यासाठी माझा मोबाईल मुले वापरू लागली. किंवा एखाद्या विद्यार्थ्याने तयार करुन आणलेला मजकूर तो इतरांना सांगू लागला.त्यातून मुलांचे शिकणे होऊ लागले आणि माझ्या वर्गामध्ये जापनीज भाषा मुले शिकू लागली. आपण काहीतरी वेगळे करत आहोत ही भावना मनाला खूप आनंद देऊन जाते.

माझ्या वर्गातील मुले सुरुवातीला  स्वतःचे नाव सांगणे,आई-वडील यांचे नाव सांगणे,यासारखी छोटी-छोटी वाक्य शिकायला लागली. त्यानंतर 1ते 100  अंक,रंगाची नावे, वारांची नावे फळे,फुले,प्राणी यांची नावे शिकू लागली.

त्यांना यामध्ये आवड निर्माण  झाली. त्यांचा आत्मविश्वास प्रचंड वाढला. आपण स्वतः शिकू शकतो हा विश्वास त्यांना मिळाला.  याचा उपयोग फक्त जपानी भाषेसाठीच नव्हे तर इंग्रजी विषयातही करू लागले परिणामी त्यांचे इंग्रजीही खूप सुधारले.त्यानंतर 15 ऑगस्ट चा कार्यक्रमांमध्ये मुलांनी जापनीज  इंग्रजी भाषेतूनही भाषणे केली. मग इंग्रजी पुस्तकातील छोटे-छोटे संवाद जापनीज भाषेतून मुले बोलू लागली.

हे सर्व अतिशय आनंददायी  वातावरणात होत होते. मुलांमध्ये जिज्ञासा निर्माण करून त्यांना एका वेगळ्याच वाटेने चालायला शिकवत आहे.याचा मला आनंद वाटू लागला. यामध्ये मी मुलांना स्वतः शिकण्यास प्रेरित केले. त्यानंतर त्यांना आव्हाने देऊन त्यांच्या  शिकण्याचा  वेग वाढवला. त्यांच्यामध्ये जिज्ञासू वृत्ती निर्माण केली. तंत्रज्ञानाचा वापर करून मुले स्वतः शिकू लागली आणि या त्यांच्या शिकण्यातुन मिळत असलेले परिणाम खूपच जास्त होते. हे सर्व भविष्यवेधी शिक्षण पद्धतीमुळे शक्य झाले त्यासाठी मी वेध परिवाराची खूप आभारी आहे.










**विद्या  बबनराव देशमुख**

**(विद्या नितीन मेमाणे)**

**शाळा:- जि.प.शाळा :-  झिंजुरके वस्ती (जुनी), ता.पुरंदर,जिल्हा:-पुणे**

**मोबाईल क्र.:- 9011686368**

# उपक्रमांकडून गुणवत्तेकडे

• कु. अनुराधा पुरुषोत्तम केळकर

आजच्या चालू घडामोडीत मुलांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. त्यातच शैक्षणिक गुणवत्ता म्हणजे नेमके काय? आणि ही गुणवत्ता वाढवण्याचा का आज आपण आग्रह धरत आहोत? ती वाढविण्यासाठी आपल्याला विविध उपक्रम कशा प्रकारे उपयोगी पडणार आहेत?

त्यात सर्वात महत्त्वाचे आहे ते शैक्षणिक वातावरण निर्माण करणे. आपण लहान मुलांवर व त्यांच्या विविध पातळ्यावर काम करत असतो. त्यांच्या या सर्व बाबींचा विचार केला असता मुलांना शिकते करण्यासाठी अनुकूल शैक्षणिक वातावरण निर्माण करणे ही प्रत्येक शिक्षकाची जबाबदारी आहे. कारण समृद्ध वातावरणातच एक सुजान विद्यार्थी घडवू शकतो.

मी घेतलेल्या अनुभवातून सांगते की, मुलांना मुक्तपणे कुठलेही साहित्य मग ते साहित्य पेटीतील असो किंवा आपण स्वतः तयार केलेले असो मुल त्याद्वारे मुक्त विचार करण्यात सक्षम बनते.

मला सांगावेसे वाटते की, माझ्या वर्गातील इयत्ता पहिलीची तेजस्विनी ही खूप अबोल विद्यार्थिनी. कुणाशी न बोलणारी, नेहमी एकटी राहणारी, कुणाशी न खेळणारी. तेव्हा माझ्या वर्गात मी एक उपक्रम घेत होती तो म्हणजे रंग आणि रंगांची गंमत. त्यात सर्वच मुलांनी सहभाग घेतला व सर्वांची रंगबिरंगी वस्तू साहित्य गोळा करण्याची धावपळ सुरू झाली. त्यात आमची तेजस्विनी अबोल विद्यार्थिनी तिने पण या उपक्रमात आपला सहभाग नोंदविला. मला तेव्हा छान वाटले की, या उपक्रमात ती पूर्णपणे सहभाग घेत आहे, रंगाची नावे सांगत आहे, एकसारख्या रंगाच्या वस्तू गोळा करत आहे, चित्रात रंग भरत आहे. अशा प्रकारे तिच्यात होणारा बदल मी स्वतः अनुभवत होती व तिच्या चेहऱ्यावरील तेज मला सुखावत होता. तेजस्वीनीत होणारा वर्तन बदल होण्यासाठी किंवा करण्यासाठी मला मदत मिळाली ते अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन या प्रशिक्षणातून मला कळाले की, विद्यार्थ्यात 6C कसे विकसित करायचे व त्यांना प्रोत्साहित करून मूल स्वतः शिकू शकते त्यावर माझा पूर्ण विश्वास बसला.




6C म्हणजेच 21 व्या शतकातील कौशल्य. स्वतः शिकण्यासाठी लागणाऱ्या सहा महत्त्वाच्या कौशल्यांचा समूह. हे कौशल्य विद्यार्थ्यांमध्ये विकसित केल्याने ते भविष्यात यशस्वी, सर्जनशील आणि जबाबदार नागरिक बनू शकतात. त्यात मुलांमध्ये सर्जनशीलता, चिंतनशील विचार, सहकार्य, संवाद कौशल्य, सामाजिक जबाबदारी, चारित्र्य व मूल्ये या सर्व कौशल्यांचा विकास विद्यार्थ्यांमध्ये आपल्याला दिसून येतो. विद्यार्थ्यांना विविध समस्या सोडविण्यासाठी व त्यांच्यात निर्णय घेण्याची क्षमता विकसित होण्यास मदत होते.

सर्जनशीलता विद्यार्थ्यांमध्ये नाविन्यपूर्ण मार्ग शोधण्यास मदत करते व त्यांच्या कल्पनाशक्तीचा विकास होण्यास मदत होते. सहकार्य, टीमवर्क इतरांना सोबत घेऊन प्रभावीपणे काम करण्याची भावना व क्षमता विद्यार्थ्यांमध्ये जागृत होते. संवाद कौशल्य वाढल्यामुळे विद्यार्थी आपले मत स्पष्टपणे व प्रभावीपणे मांडते व व्यक्त करते. करणे, बोलणे यामुळे विद्यार्थी उत्तम श्रोता व तेजस्वी वक्ता बनू शकतो त्यामुळे त्यांचे लेखन व वाचन कौशल्य वाढण्यास मदत होते. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारी निर्माण झाल्याने समाजासाठी एक सामाजिक नागरिक बनण्यास व सामाजिक योगदान व सर्वांना सहकार्य करणारा नागरिक घडतो. चारित्र्य व मूल्ये विकास आणि विद्यार्थ्यांमध्ये प्रामाणिकपणा इतरांसाठी सहानुभूती स्वतःवर नियंत्रण आणि विविध जबाबदारी यासाठी विद्यार्थी सज्ज होतो. या सर्व कौशल्यांचा विद्यार्थ्यांमध्ये विकास करण्यासाठी आपण विविध उपाय व उपक्रम राबवून त्यांच्यात ही सर्व मूल्ये विकसित करू शकतो. उदाहरणार्थ प्रश्नोत्तरे व चर्चा यामध्ये विद्यार्थ्यांना स्वतःला व्यक्त करता येते व त्यांचा स्वतःवरचा आत्मविश्वास वाढतो. सामूहिक उपक्रम जसे बांधकाम, मातकाम विविध आकृत्या तयार करणे त्यामुळे विद्यार्थ्यांचा आपसी संवाद सुधारतात व ते एकमेकांना मदत करतात. कला, संगीत, नाट्य अभ्यासक्रमामध्ये विद्यार्थ्यांना स्वतः सहभागी होऊन जर त्यांनी कृती केली तर ते चिरकाल त्यांच्या बालमनावर कोरली जाते. त्यामुळे त्यांची सर्जनशीलता वाढते.

स्वतंत्र विचार करणे व स्वतःचे निर्णय घेण्याचा प्रसंग त्यांना द्या. त्यामुळे त्यांची निर्णय क्षमता व योग्य-अयोग्य याची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये होते व त्यांच्यावर चांगले संस्कार करता येते. आणि या दृष्टिकोनातून मी आज माझ्या शाळेत विविध प्रकारचे उपक्रम राबवीत आहे. ह्या बाबी वेधच्या विचारातून, वेधस्त्रोतांच्या संपर्कात राहून अवगत झाली आहे.








**कु. अनुराधा पुरुषोत्तम केळकर (स. शि)**
**जिल्हा परिषद उच्च प्रा. शाळा तेजापूर.**
**ता. वणी, जि. यवतमाळ.**
**संपर्क क्र.-8788345637**

# "भविष्यवेधी शाळा"



जिथे शिकविणे कमी
शिकण्याची जास्त हमी
तीच असते भविष्यवेधी शाळा

"मुलं स्वतः शिकतं" विचार समोर ठेवून
भविष्यवेधी शिक्षणाच्या सहा पायऱ्या वापरून
मुलांना शिकते करते शाळा
तीच असते भविष्यवेधी शाळा...

"गटकार्य, पियर लर्निंग,विषयमित्र" यांचा वापर करून
सहद्याही अध्ययन करून
१००% मुलांच्या १००% क्षमतांचा विकास करते शाळा
तीच असते भविष्यवेधी शाळा...

मुलांच्या जिज्ञासा वृत्तीचा सन्मान करून
शिकण्यात आव्हान देऊन
सेल्फी विथ सक्सेस घेते शाळा
तीच असते भविष्यवेधी शाळा...

"असर,न्यास, पिसा" अध्ययन स्तर समोर ठेवून
नियोजन व्यवस्थापन नेतृत्व करून
मुलांना स्वतः शिकण्यास प्रेरित करते शाळा
तीच असते भविष्यवेधी शाळा...

जिथे,
मुले शिकण्यात तंत्रज्ञानाचा वापर करतात
स्वतः शिकण्यास प्रेरित होतात
मुलांना तिप्पट गतीने शिकते करते शाळा
तीच असते भविष्यवेधी शाळा...


**श्री. योगेश अशोक सोसे**
**जि. प. प्राथमिक शाळा पिंप्री**
**ता. रावेर, जि. जळगांव.**
**मो.नं-७७७५९९२०१३**

# वेध प्रकाशन


## वेध परिवारातर्फे प्रकाशित पुस्तके




किमत 160 रु. फक्त





किमत 210 रु. फक्त





किमत 190 रु. फक्त


**आगामी पुस्तके लवकरच वाचकांसाठी उपलब्ध**




भाग-1




भाग-2




## Online पुस्तके खरेदी करण्यासाठी येथे क्लिक करा .

https://vedhfuturisticeducation.myinstamojo.com/




# छोटा बच्चा समझे है क्या ?



• **श्रीमती उमेश्वरी साहू**

जब से पाँचवी केन्द्रीयकृत की परीक्षाएं शुरू हुई है, तब से मेरा मन बहुत ज्यादा व्यथित था,क्योंकि मैं अपने कक्षा 1ली,2री के बच्चों पर ध्यान ही नही दे पा रही थी।आज भी मेरा ध्यान पाँचवी के बच्चों पर ही अटका हुआ है, क्योंकि कल उनका अंग्रेजी पेपर है। तो मै चाहती हूं कि जितने भी मॉडल पेपर है कम से कम सभी प्रश्नों को हल करें ।इसलिए मोबाइल लेकर मै उसी कक्षा मे बैठ गई क्योंकि प्रश्नपत्रों के पीडीएफ उपलब्ध हैं ।कुछ समय बाद कक्षा 1 एवं 2 के बच्चों ने मुझे इशारों इशारों में समझा दिया कि वे मुझसे बहुत नाराज है तब मुझे समझ आया कि मैंने कितनी बड़ी गलती कर दी है। फिर मैंने सोचा,गलती सुधारने के लिए क्या किया जाये? तभी
💡दिमाग मे घंटी बजी सब समस्या का केवल एक बटन भविष्यवेधी नवाजतन |

मैंने सोचा चलों इनको इबारती प्रश्न मे उलझाया जाए क्योंकि मुझे लगा कि कक्षा 1,2 वालों के लिए यह तो बहुत कठिन है, इसलिए मैंने चुपचाप इबारती प्रश्नों का 10-12 पर्ची बनाया और ट्रे मे रखकर ब्लैक बोर्ड मे निर्देश लिखा दिया ---



१ ट्रे से पर्ची उठाएं।
२ पर्ची मे लिखें सवाल पढ़े।
३ सवाल पढ़कर उत्तर दें।
४ उत्तर पता नहीं होने पर साथी से मदद लें।
५ जो साथी नही कर पा रहें हैं उनकी मदद करें ।

जैसे ही मैंने ट्रे रखकर बोर्ड पर निर्देश लिखा बच्चे घेरे मे बैठ गए।
मेरेबच्चेजानतेहै सीखने को कैसे सीखना है?
इस लिए मै वापस आकर पुनः कक्षा 5वी मे बैठ गई। पर मेरा ध्यान वही था। सभी बच्चे ग्रुप मे एक दूसरे के साथ सीख रहें थे।
तभी कुछ समय बाद कक्षा पहली की बच्ची रिद्धिमा अपनी कॉपी लेकर मेरे पास आई । जब मैंने कॉपी देखा तो मै बहुत आश्चर्यचकित हुई क्योंकि तब मैंने केवल इबारती प्रश्न हल करना सीखेंगे सोचा था, किन्तु बच्ची ने मेरे सोच से भी दो कदम आगे बढ़कर स्वयं से इबारती प्रश्न का निर्माण किया।
अब जो बच्चा स्वयं से प्रश्न बनाने की ओर बढ़ रहा है, क्या कोई प्रश्न उनको आगे बढ़ने से रोक पायेगा? या 6C का कोई C उनमे छुट जायेगा?
कभी कभी मुझे याद रह जाता है कि मै गुरूजी हूं, गुरुजी होने के अभिमान से सोचने लगती हूँ इन बच्चों को कहां आएगा? पर ये बार बार मुझे एहसास दिलाते हैं एक बार हमें खुले आसमान में उड़ने का अवसर दीजिये हम बता देंगे ।

बच्चा सुनकर हमको बच्चा समझे है क्या ?

मेरे 21 वी सदी के बच्चे मुझे अहसास करवा जाते हैं कि मै केवल उनके दोस्त हूं।मेरा काम उन्हें सीखने के ज्यादा से ज्यादा अवसर देने है।



कभी-कभी दबी जुबानों से या मेरे सबसे बड़े शुभचिंतकों से सुनने को मिलता है कि लोग मेरे बारे मे बोलते है, मैडम क्या खाक पढ़ाती होंगी जब देखो तब केवल फोटो खीचना और वीडियो बनाना ही करती है ।

लोगों की बातें सुनकर कभी-कभी मै भी सोचने पर मजबूर हो जाती हूं कि हाँ, आजकल मैने बच्चों को पढ़ाना छोड़ दिया है और फिर, फिर क्या ? मै भी पढ़ाने लग जाती हूं।

लेकिन मेरे बच्चे ठहरे भविष्यवेधीजनरेशन के अपडेटेट बच्चे तुरंत टोककर बोलते है, क्या .....मेम......... ? कभी- कभी आप भी बोर करने लग जाते हो। मजा ही नही आता। चुनौती दीजिये, हमें चुनौती लेने मे खूब मज़ा आता है ।



फिर चुनौती देने के बाद कक्षा 1 के (100%) बच्चे भी केवल एक शब्द मात्र से स्वयं से प्रश्न बना लेते है। कुछ बच्चे अपने जिज्ञासू भरे प्रश्नों को लिख लेते हैं तथा कुछ शब्दों से कहानी बना लेते हैं।अपनी पाठ्य-पुस्तक के अलावा अगले कक्षा के पाठ्यपुस्तक को स्वयं से समझकर अपने दोस्तों को भी सीखा देते हैं तथा वे नवोदय की मानसिक योग्यता भी हल करने की कोशिश करते हैं। तो मेरा सेल्फी लेना और वीडियो बनाना बढ़िया है या पढ़ाना? थोड़ा सोचना पड़ेगा।





**श्रीमती उमेश्वरी साहू**
**सहायक शिक्षक**
**शा प्रा शा माहरापारा,भैरमगढ़**
**जिला- बीजापुर**

# मुलांच्या मनाशी घट्ट नाते जोडले की..,
# शिकण्याची आवड अंत:करणापासून निर्माण होते..



• **तृप्ती तोडकर**

आदिवासी पाड्यातील अश्विनी आठवड्यातून दोनदाच शाळेत यायची आणि आली तरी जास्तीत जास्त एकच तास शाळेत बसणार खूप मोठ्याने रडायला सुरुवात करणार डोकं दुखतंय असं म्हणणार आणि घरी जाणार ती पुन्हां शाळेत येण्यासाठी असा तिचा जो दिनक्रम ठरलेला होता त्यामुळे तिला शाळा शाळेतली मुलं अभ्यास शिक्षक यापैकी कोणीही आवडत नव्हता तिला सुरक्षित वाटायचं ते आपल्या घरी पण जेव्हा मी जुलै २४ ला त्या शाळेत बदली होऊन गेले तेंव्हा पाहिलं अरे ही आठवड्यातून फक्त 2 तासच शाळेत असते ते पण आई रागावते म्हणून. आज अश्विनी शाळेत आली, परिपाठ होईपर्यंत बसली, तिने तिचा ठरवलेला कार्यक्रम सुरू केला, मोठ्याने रडू लागली. आज मात्र माझा निश्चय पक्का झाला होता काही झालं तरी तिला घरी जाऊ द्यायचे नाही, मी तिच्या जवळ गेले, तिचे केस विस्कटलेले, नाकातून पाणी चालूच, कपडे अत्यंत मळके, पायावर ओघळ आलेले, अंघोळ तर देव जाणे कधी केली असेल. मी तिला मांडीवर बसवले आधी शांत केले. मग विचारले का रडते तू, माझे खूप डोके दुखत आहे, इयत्ता पहिलीच्या मुलीला काय कळावं डोकं दुखतंय असा विचार येऊन मी पुन्हा विचारले तू जेवली नाहीस का, तुला झोप आली का? तर तिचे उत्तर एकच डोके दुखत आहे. आपण आधी तुझे केस नीट करू, तोंड स्वच्छ धुवू मग मी तुला घरी पाठवते. मी इयत्ता चौथी तीलतिच्याच पाड्यात राहणाऱ्या अनिषाला बोलावलं. अनिषा हिला घरी घेऊन जा अंघोळ घालून आण. बाकी मी आवरते. कारण बाहेर खूप पाऊस चालू होता, शाळेत तिला स्वच्छ करणं अशक्यच होतं. चटकन अनिषाच्या मागे गेली, अनिषाने तर तिचे सर्वच आवरून तिला शाळेत आणले, ती फार गोड दिसू लागली,








तो पर्यंत जेवणाची सुट्टी झाली, मला वाटलं आता ही काही तरी निमित्त काढून घरी जाणार आणि परत शाळेत येणार नाही. मन थोडं नाराज झालं. माझ्या सहकारी आणि मी आम्ही मुलांसोबत जेवायला बसलो सारखे लक्ष अश्विनी कडे जात होते, तेवढ्यात ती आलीच, मॅडम घरी जाऊ का? पाण्याची बॉटल आणायची आहे. मी ही जा म्हटलं, पुन्हा वाटलं ती जर घरी गेली तर शाळेत येणार नाही. जर नाही आली तर

आपण घरी जाऊन आज तिला घेऊन यायचं असं मनाशी पक्क ठरवलं होतं. आमची सर्वांची जेवणं झाली, आणि मी वर्गात जायला वळले तर तेवढ्यात मागे येऊन कोणी तरी पकडले, मला विचारते तुम्ही जेवलात मॅडम? मी मागे पाहिले तर अश्विनी, मला रडूच आले. मी तिच्या समोरच जेवले होते, पण काय बोलावं ह्या विचाराने गोंधळलेल्या अश्विनीने मला असा प्रश्न विचारला. मी पटकन सावरून तिला हसून विचारले का ग आता नाही तुझे डोके दुखत का? दुखते मॅडम पण. मग शाळेत आलीस तू, घरी नाही राहिली स, नाही मी आता घरी राहणार. तेंव्हा मला जाणवलं.

**||एक प्रेम भाव चाहीये। दुजा कष्ट अपार ।।**

मुलं ही फक्त प्रेमाची भुकेली असतात. त्यांना ती गोष्ट मिळाली शिकण्याची ऊर्जा आपोआप निर्माण होते. ती शाळा सुटे पर्यंत छान बसली, मी दररोज श्यामची आई गोष्ट घ्यायचे. त्यानंतर सर्वांना घरचा अभ्यास द्यायचे.




एक नवीन आव्हान प्रत्येक वर्गाला द्यायचे. म्हणून मी इयत्ता पहिलीच्या मुलांना १ ते २० संख्या अंकात अक्षरात लिहून देत होते हे त्यांनी फळ्यावर अचूक कोण लिहून दाखवणार त्याला *स्टार* देणार. असे म्हणत प्रत्येकाला लिहून देत होते. अश्विनी आली, मी विचार केला तिला असे दिले तर ती यायचीच नाही शाळेत. म्हणून मी तिला तिचे पूर्ण नाव लिहून दिले. ती म्हणते कशी मॅडम ह्यांना दिलंय तसलं मला पण द्या. मला हसू आले,आणि टेन्शन पण आले, ती जर अभ्यास पाहून शाळेतच नाही आली तर... म्हणून मी म्हटले, तू करणार का तो अभ्यास. कारण तिला १ ते २० संख्या म्हणायला पण येत नव्हत्या. मी म्हटलं बाळा तू १ पासून २० पर्यंत म्हणून दाखवलं तरी तुला स्टार देणार मी. लिहायला आपण हळू हळू शिकू. नाही मला तोच अभ्यास पाहिजे, ती हट्ट करू लागली. मी ही तिला संख्या अंकात अक्षरात लिहून दिल्या. शाळा सुटली, दुसऱ्या दिवशी खूप पाऊस होता छत्री होती तरी मी थोडी भिजले, साडी चिखलाने थोडी खराब झाली तसेच शाळेत पोहचले तर अश्विनी दत्त म्हणून समोर उभी, मलाच वाटले मला काय भास होत आहे का, सारखा विचार करून, त्या क्षणात ती पळत पावसात समोर आली, हाताला धरले, चला मॅडम लवकर भिजताल तुम्ही, तेवढ्यात छत्री तिच्या डोक्यावर धरली आणि मी अजून थोडी भिजलेच. काय मॅडम तुम्ही, आता दिवसभर असेच बसणार, माझ्या आईच्या ड्रेस आणू काय तुम्हाला, मी फक्त तिच्याकडेच पाहत राहिले. सावध होऊन नको बाळा, मी आणली आहे दुसरी साडी. बदलते मी, मी साडी बदलून येई पर्यंत फळ्यावर

फळ्यावर १ ते ५ बरोबर लिहलेलं आणि पुढे २० पर्यंत चुकीचे लिहलेलं होतं. मला पाहताच मोठ्याने ओरडली मॅडम मी लिहलं माझे चेक करा. सगळी मुलं तिच्याकडेच पाहत होते, कधीच जागा न सोडणारी अश्विनी, कधीच कोणाशी न बोलणारी अश्विनी आज एवढी बदलली होती. तेवढ्यात मानवी म्हणाली, बघा ना मॅडम मला सगळं लिहता येतं तरी अश्विनीने लिहू दिले नाही, स्वतः मात्र सगळं चुकीचं लिहलं आहे. असू दे ग बाळा, तू आता परत लिही, म्हणून मी फळा स्वच्छ करायला लागले तर मॅडम मला द्या की स्टार,असा आवाज ऐकू आला. मी पण पटकन स्टार पाकीट काढले, सांग तुझ्या आवडीचा रंग तिने लाल रंग निवडला मी तिच्या हातावर चिकटवला. तिला एवढा आनंद झाला ती रडू लागली, तशी माझ्या पायांना मिठी मारत म्हणाली, आज लय चुकलं ना माझे उद्या अजून चांगला अभ्यास करते.

सगळ्या मुलांनी तिच्यासाठी टाळ्या वाजवल्या. आव्हान आणि स्टार यामुळे मुलांच्यात एक वेगळीच आनंददायी चुरस निर्माण झाली. आता प्रत्येक जण आपण बसलेलं दिसलं की लगेच मांडीवर येऊन बसे, घरी काय काय घडलं हे सर्व सांगत असे. ५ वाजता शाळा सुटताना मॅडम अजून थोडा वेळ घ्या ना शाळा, आपण शाळेतच थांबू, तू द्या किती पण आव्हान अवघड आम्ही पूर्ण करू असे त्यांचे शब्द ऐकायला मिळाले. अश्विनीचे बदलेले रूप पाहून आदिवासी पाड्यातील आर्यन, प्रीती, रुद्राक्ष, रविना, समृद्धी बोलते झाले. ते ही रोज शाळेत यायला लागले. त्यांना शाळा, अभ्यास आवडू लागला. आता तर असे झाले की मुलांना त्यांच्या लक्षात आले, आपल्याला काय येत नाही, आपल्याला इतर सर्व विद्यार्थ्यांच्या सारखे काय आले पाहिजे. त्यामुळे तेच स्वतःचे आव्हान ठरवू लागले. दुसरीतील रुद्राक्ष, मुळाक्षरे येत होती, आज तो स्वतःहून आला मॅडम मी चौदाखडी लिहून आणतो, लक्षात ठेवतो व तुम्हाला उद्या फळ्यावर लिहून दाखवतो. मला चौदाखडी आली तरंच मला रिषभ सारखं छान वाचता येईल. मी म्हटलं हो तू करून ये मी तुला स्टार देईल. एका छोट्याश्या आव्हान व स्टार ची किंमत एवढी मोठी असेल असे मला कधीच वाटले नव्हते. आज अश्विनी छान वाचन करते,१ ते १०० संख्या अचूक ओळखते, १ ते २५ अचूक अंकात अक्षरात लिहते, बेरीज – वजाबाकी सर्व आधी करून दाखवते. शब्द डोंगर लिहण्याच्या प्रयत्न करते. दुसरीचा रिषभ तर 7 अंकी वजाबाकी, ७ अंकी संख्येला २ अंकी संख्येने गुणाकार क्रिया अचूक करतो. वर्गातील प्रत्येक मूल त्याच्या गतीने शिकण्यास प्रवृत्त झाले, आनंदाने, आवडीने शिकत आहे, आणि विशेष म्हणजे शाळा आणि अभ्यास दोन्ही गोष्टी त्यांना अंतकरणापासून आवडू लागल्या, ह्या पेक्षा अजून काय हवं असतं एका शिक्षकाला. एका अश्विनीने, संपूर्ण वर्गाला शिकण्याची जिद्द निर्माण करून दिली.





**सौ तृप्ती नितीन तोडकर**
**जि प प्राथ. शाळा वळवंती, ता.मावळ, जि. पुणे**

# भविष्यवेधी शिक्षण संस्कृती



- **रागिणी सज्जन वाडेकर**

सध्या सगळीकडे बदलीचे वारे वाहत आहेत. प्रत्येकाला बदलीचे वेध लागले आहे, बदलीनंतर कोणती शाळा मिळेल? ती शाळा कशी असेल? माझ्या सोयीची असेल का?यासारखे अनेक प्रश्न मनात गर्दी करत आहेत. त्याचबरोबर आणखी एक प्रश्न म्हणजे मी बदली करून गेल्यानंतर या मुलांचे काय होईल? कसे होईल?हाही प्रश्न मनात घोळत असतो.

पण खरं सांगू का मीही यंदा बदली पात्र आहे. डिसेंबर 2014 पासून मी जिल्हा परिषद शाळा पावला पश्चिम तालुका, जिल्हा नंदुरबार येथे कार्यरत आहे. दहा वर्षे पूर्ण झाल्या कारणाने बदली होणार हे निश्चित.ही माझी पहिली शाळा. पण ही शाळा सोडून जाताना या मुलांचं कसं होईल हा प्रश्नच मुळात डोक्यात येत नाही. याचं कारण म्हणजे वेध विचार हो वेध विचाराच...

जानेवारी 2022 पासून मी भविष्यवेधी शिक्षण पद्धतीवर काम करत आहे आणि त्याचे खूप छान परिणाम आम्हाला मिळत आहेत. आधी शाळेत गेल्यावर मुलांना सांगावं लागायचं की, "चला वही, पुस्तक काढा.अभ्यासाला सुरुवात करा." पण आता असं काही सांगावच लागत नाही.मुलं स्वतःहून अभ्यास करत असताना दिसतात. काही कारणांनी जर ऑफिसमध्ये जावं लागलं आणि तिथे जरा वेळ जास्त लागला तरी देखील वर्गात पुन्हा आल्यावर पाहिलं तरी सर्व मुलं शहाण्या बाळासारखी अभ्यास करताना दिसतात.कोणी जोडीमध्ये,कोणी गटात तर कोणी वैयक्तिक अभ्यास करत असतो. याचबरोबर सगळी मुलं एकच काम करताना कधीच दिसत नाही. जो तो त्याच्या आवडीप्रमाणे आणि त्याच्या क्षमतेनुसार त्याच्या स्तरानुसार काम करत असतं.कोणी मराठीचा,कोणी गणिताचा, कोणी इंग्लिशचा तर कोणी अगदी चित्रकलेचा सुद्धाअभ्यास करताना दिसतात.तेही अगदी मनापासून आणि आनंदाने करत असताना पाहायला मिळतं.

हे सर्व काही जादूची कांडी फिरवल्यासारखं अचानक झालं नाही.यासाठी आम्ही मुलांना त्यांना हवा तितका वेळ देतो.मुख्य म्हणजे मुलं स्वतः शिकण्यासाठी प्रेरित झालेले आहेत.सेल्फी विथ सक्सेस ने तर कमालीची जादू केली आहे सर्व मुलांवर.आव्हान दिल्यावर मुलं झपाटून,अगदी तहानभूक विसरून कामाला लागतात. दुपारी जेवायची सुट्टी झाली तरी एक दोन मुलं वर्गात बसून त्यांचं काम पूर्ण करत असतात. " अरे, तुम्हाला जेवायला जायचं नाही का? " तर त्यांचे उत्तर असतं,






"मॅडम,थोडसंच राहिलं आहे आमचं...हे झालं की जातो आम्ही..." काही मुलं त्यांचे जेवण झाले की लगेच सुट्टी संपायच्या आधी, स्वतःहून वर्गात येऊन त्यांचं काम सुरू करतात. प्रगती, सलोनी, रुकसाना,ऋषभ, सुमित, वेदांत ही माझ्या वर्गातील असरची मुलं.पण आज त्यांच्यामध्येही कमालीचा बदल झालेला पहावयास मिळत आहे. आधी काहीही काम सांगितलं की, खाली मान घालून बसणारी ही मुलं..आता धीटपणे पुढे येत आहेत. आधी जेमतेम दोन अक्षरी शब्द भीत भीतच वाचणारी ही मुलं आता वाक्य वाचन पर्यंत पोहोचली आहेत. हे सर्व घडण्यामागचं कारण म्हणजे वर्गात रुजत असलेली भविष्यवेधी शिक्षण संस्कृती. ही मुलं वर्गात जोडीने शिकत असतात, कधी गटात शिकत असतात, तर कधी अंश, खुशी, अक्षदा,श्रेयस,अर्णव हे विषय मित्र त्यांना मदत करत असतात. या मुलांशी बोलताना एक काळजी नेहमी घेतली जाते. ती म्हणजे त्यांना त्यांचे पॉझिटिव्ह पॉईंट सांगितले जातात. त्यांचे नेहमी कौतुक केलं जातं. पाठीवर शाबासकीची थाप दिली जाते. त्यामुळे त्यांना खूप हुरूप येतो. जेमतेम 1 ते 20 पर्यंत संख्या ओळखता येणारा ऋषभ आणि वेदांत हे तर संख्या वाचन मध्ये इतके पक्के झाले आहेत, की आता कोणतीही संख्या विचारा लगेच बरोबर वाचून दाखवतात.

अभ्यासात हुशार असणारा श्रेयसउर्फ आमच्या सगळ्यां-चा लाडका चिकू. काही दिवसापूर्वी चित्र काढ म्हटलं की, " मॅडम, मला नाही येत चित्र काढता..." म्हणून रडायचा पण आता चिकूमध्ये एवढा बदल झाला आहे




की, चिकू एखादे चित्र बघून हुबेहूब काढतो.26 जानेवारी निमित्त आमच्या शाळेचे मुख्याध्यापक श्री विजय वळवी यांनी लाल किल्ल्याचे चित्र काढले होते. चिकूने पण बघून हुबेहूब तसेच चित्र काढले. ही सर्व जादू,चिकू मध्ये झालेला हा बदल पाहून आम्हालाही खूप आनंद झाला . चिकूमध्ये झालेल्या या बदलाची सुरुवात झाली ती वारली पेंटिंग या उपक्रमामध्ये. गेल्या वर्षी समर कॅम्पमध्ये आम्ही युट्युब वर पाहून वारली चित्रकला शिकलो. यामध्ये अत्यंत सोप्या, मूलभूत आकारापासून चित्र रेखाटले जाते. जेणेकरून मुलांमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो आणि मुलं खूप छान अशी चित्र काढू लागली. एखादी गोष्ट शिकायची कशी हे मुलांना आता समजू लागले आहे. मोबाईलवर केवळ गेम न पाहता मोबाईलचा उपयोग शिकण्यासाठी होऊ लागला आहे. मुलं त्यांना येणाऱ्या अभ्यासातील अडचणी youtube, google सर्च करत आहेत.नवनवीन माहिती मिळवून वर्गात सादर करत आहेत. गुगल ट्रान्सलेट चा वापर करून जपानी भाषेत प्राथमिक गोष्टी, परिचय आम्ही शिकलो.

त्याचबरोबर पूर्वी 15 ऑगस्ट 26 जानेवारी जवळ आली की, मुलं माझ्याकडे भाषण लिहून द्या. म्हणून तगादा लावायची. किती मुलांना भाषण लिहून द्यायचे?आणि वेगवेगळे काय लिहून द्यायचे? असा प्रश्न मला पडायचा पण आता भविष्यवेधी पद्धतीने काम करत असताना मला ही अडचण जाणवत नाही. मुलं आता स्वतःच भाषण स्वतः लिहून आणत आहेत. प्रसंगी पालकही त्यांना मदत करत आहेत आणि आमची कामं सोपी होत आहेत. आता कोणत्याही महापुरुषांची जयंती किंवा पुण्यतिथी असो मुलांना फक्त सूचना दिली की मुले स्वतःहून भाषणाची तयारी करतात. सांस्कृतिक कार्यक्रमासाठी तयारी करत असताना आम्ही बरेचसे नृत्य प्रकार युट्युब वरून शिकलो. सलोनी आणि प्रगती दोघींची खूप छान मैत्री.दोघी नेहमी सतत सोबत असायच्या. कुठेही जायचं म्हटलं की दोघी सोबतच जाणार... आधी वर्गात कमी पण बाहेर जास्त फिरत असायच्या. पण आता आमचे मुख्याध्यापक म्हणतात की, " मॅडम तुम्ही यांच्यावर काय जादू केली आहे काय माहित?आता या वर्गात बसून काहीतरी लिहीत बसलेल्या असतात." मी हसून म्हटले, " सर ही जादू मी नाही तर भविष्यवेधी शिक्षणाने केलेली आहे. "

स्वतः शिकण्याची सवय केवळ मुलांनाच नाही तर आपल्यालाही लागणे गरजेचं आहे . वेध परिवारामध्ये एक गोष्ट शिकायला मिळाली की,कोणी काही विचारले की त्याला लगेच उत्तर द्यायचे नाही.त्याला ते उत्तर शोधण्यास मदत करायची उत्तरापर्यंत पोहोचण्याचा रस्ता सांगायचा आणि तीच सवय खूप उपयोगी पडत आहे. पूर्वी शाळेचं काहीही ऑनलाईन काम असेल किरकोळ असेल तर सर माझ्याकडे यायचे आणि माझ्या आवाक्या बाहेरचे असेल तर केंद्रातील तंत्रस्नेही शिक्षकांची मदत घेत.. पण वेधमध्ये आल्यापासून या सगळ्या गोष्टी शिकण्यास सरांना मदत केली. आम्ही दोघे मिळून शिकलो. मदतीला youtube आणि गुगल बाबा होतेच की..आज शाळेची 90% ऑनलाईन ची काम आमचे मुख्याध्यापक स्वतः करतात. एक साधी लिंक भरायची म्हटलं तरी घाबरणारे मुख्याध्यापक श्री. विजय वळवी सर यांनी आमच्या शाळेचे SQAAF चे काम स्वतः पूर्ण केले. ही खूप अभिमानास्पद बाब आहे आमच्यासाठी. आव्हानांवर काम करत असताना अर्चना नेहमी पहिली यायची. मुलं इतकी झपाटून काम करून करत होती की, त्यांच्या वह्या संपून जात होत्या.अर्चनाचे पप्पा तिला म्हणत, " बाळा... आता ठेवून दे. झोप... " तर अर्चना सांगायची, " नाही पप्पा. मला पहिले यायचे आहे. " ती रात्री उशिरा जागून व पहाटे लवकर उठूनही लिहीत असायची.

जबाबदारी टाकली की मुलं जबाबदार बनतात हे वारे गुरुजींचं वाक्य मनात घर करून गेले.आम्ही देखील शाळेत विद्यार्थी साहित्य भंडार सुरू केला आहे. त्याची जबाबदारी अक्षदा आणि अर्णव यांच्याकडे सोपवली आहे.मुलांना लागणाऱ्या वस्तू देणे, त्याची किंमत सांगणे, पैशांचा व्यवहार, हिशोब ठेवणं ही सर्व कामे दोघे खूप छान पद्धतीने पार पडत आहेत.शाळेच्या चाव्या आमच्या अर्चनाकडे असतात.सर्व वर्ग उघडणे, साफसफाई करणे ही सर्व कामे अर्चना विना तक्रार करते.आरोही, मेहक, रुक्साना, ऋतिका या सफाईसाठी मदत करतात. झाडांना पाणी टाकण्याचे काम सर्व मुलं आनंदाने करतात. त्याचा परिणाम म्हणजे मार्च महिन्यातही आमची शाळा आणि बाग सदाबहार दिसत आहेत. पावसाळ्यात झाडे लावत असताना मुलांनीही घरून तुळस, गुलाब,झेंडू,आंबे, जांभूळ इत्यादींची रोप आणून लावली. प्रगती आणि हंसिकाने आणलेल्या झेंडूच्या रोपांनी तर शाळेची शान आणखीनच वाढवली.अशीही इतकी सुंदर शाळा आणि तितकीच सुंदर माझी मुलं...

आता सोडून जाताना थोडंसं वाईट वाटत आहे पण काळजी किंवा यांचं नंतर काय होईल अशी

चिंता वाटत नाही. याचं कारण म्हणजे वेध विचार... निलेश सर सांगतात त्याप्रमाणे आम्ही मुलांना कुबड्या दिल्या नाहीत. त्यांना स्वतःच्या पायावर चालायला शिकवत आहोत. स्पून फीडिंग नाही तर मुलं स्वतः शिकायचं कसं हे शिकले आहेत. एक शिक्षक म्हणून मी या मुलांच्या आयुष्यात किंवा ही मुलं माझ्या आयुष्यात फार कमी काळ असणार आहेत पण या कमी वेळेत त्यांच्या पंखात बळ निर्माण करण्याचं काम आपल्याला करायचं आहे. आणि ते करण्यासाठी भविष्यवेधी शिक्षण हे संजीवनीच काम करत आहे. माझी मुलं पुढे कोणत्याही शाळेत गेली तरी ती तिथे चांगलंच नाव काढतील हा विश्वास आहे आणि या शाळेत रुजलेली भविष्यवेधी शिक्षण संस्कृती ही कायम राहील. मुलं स्वतः शिकत राहतील एकमेकांच्या मदतीने हा विश्वास आहे.. आणि हा विश्वास माझ्यामध्ये निर्माण केल्याबद्दल मी आदरणीय नंदकुमार सर, निलेश सर आणि संपूर्ण वेध परिवाराची सदैव ऋणी असेल.










**रागिणी सज्जन वाडेकर**
**जिल्हा परिषद शाळा पावला पश्चिम ,**
**तालुका जिल्हा नंदुरबार**
**मोबाईल 8379838712**

# “भविष्यवेधी वेध कृती वाढवतात, इंग्रजी शिक्षणाची गती .”



Experience is the best Teacher,

- **सौ प्रिया नितीन उपासनी**

म्हणजे अनुभवासारखा दुसरा गुरु नाही असे आपण नेहमीच म्हणतो. "अध्ययन अध्यापन " प्रक्रियेत विद्यार्थ्यांना आपण जेवढे जास्त अध्ययन अनुभव देऊ तेवढेच ते समृद्ध होतात यात शंकाच नाही.
अशीच आशयाची, अनुभवाची समृद्धी "अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन" या प्रशिक्षणातून मला मिळाली.
"सन्माननीय नंदकुमार सर' "सन्माननीय निलेश घुगे सर " व संपूर्ण वेध परिवार यांनी प्रशिक्षणातून " शिक्षक समृद्धी" घडवली.


शिक्षक विद्यार्थ्यांमधील सृजनशीलता हेरली. मुल स्वतः शिकते का? याचे उत्तर हे प्रशिक्षण घेण्याआधी मी नाही असे दिले असते. पण प्रशिक्षणानंतर विद्यार्थ्यांना स्वतः शिकायला मी प्रेरित करायला लागले. या प्रशिक्षणातील सर्वात भन्नाट कल्पना म्हणजे आपला " सेल्फी विथ सक्सेस" या सेल्फीने विद्यार्थ्यांच्या, शिक्षकांच्या जाणिवा समृद्ध केल्या. काय करू ?कसे करू ?मला हे जमेल का ? हे कुठे शक्य असते? आपण मुलांना शिकवल्याशिवाय आपले मुल थोडेच शिकते?
असे माझ्या मनातील असंख्य प्रश्नांचे मोहोळ अलगद रित्या दूर केले ते आमच्या वेध परिवाराने.
"इंग्रजी" हा विषय विद्यार्थ्यांना मुळातच कठीण वाटणारा. इंग्रजी बोलणे, मुलांशी इंग्रजीतून संवाद साधणे ,मुलांना इंग्रजी बोलण्यास प्रेरित करणे हे शिवधनुष्य पेलायचे कसे?


या माझ्या प्रश्नाला" सौ दुखो की एक दवा" असल्यासारखेच वेध कृतींनी "होय हे शक्य आहे" म्हणत दिशा दाखवली. स्पोकन इंग्लिश संदर्भात,

"माय सेल्फ" ही वेध कृती घेताना माझ्या इयत्ता आठवीच्या वर्गातील लक्षणा वाघमोडेनी दहा ते पंधरा वाक्य तयार केली. जेव्हा तोंडी परीक्षेची वेळ आली आणि मी सगळे प्रश्न इंग्रजीतून विचारले तेव्हा मुलांच्या चेहऱ्यावरच्या रेषा जरा हलल्या पण नंतर मात्र त्यांनी आत्मविश्वासपूर्वक उत्तर दिली. हे झाले लक्षणाचे आणि माझ्या विघ्नेश नावाच्या विद्यार्थ्याने तर "मॅडम मै आपको ५०० वर्ड लिखा के दिखाता हू तो मेरे साथ सेल्फी निकालेंगे ना ?" म्हणत पाचशे शब्द लिहून दाखविले. इयत्ता सातवीच्या रोहिणी नावाच्या मुलीचा तर वेगळा सूर "टीचर मेरी मा मुझे अंग्रेजी मीडियम मे डालने वाली है" असे तिने मला नुकतेच सांगितले. आता या प्रश्नाला सडेतोड उत्तर द्यायचे असे मी मनोमन ठरवले .

दुसऱ्या दिवशी नेहमीप्रमाणे वर्गात गेले नेहमी मराठीत बोलणारी, मराठीत इंग्रजी शब्दांचा अर्थ सांगणारी मी आज इंग्रजी भाषेत बोलू लागले. त्या मुलांच्या चेहऱ्यावर माझ्या कृतीने भले मोठे प्रश्नचिन्ह उमटले पण माघार घेते ती मी कसली सगळ्या मुलांची इंग्रजी विषयाची तोंडी परीक्षा इंग्रजीत पार पडली.
What is your hobby? Do you like to play? Where do you live?
Who is your best friend?









या आणि अशा अनेक प्रश्नांनी आमची इंग्रजी विषयाची तोंडी परीक्षा रंगली. खरी पण मजा आता नंतरच आली. दुसऱ्या दिवशी मी वर्गात गेले तेव्हा रोहिणी माझ्याकडे आली आणि मला म्हणाली मॅडम मी माझ्या आईला आपल्या इंग्रजी विषयाच्या तोंडी परीक्षे विषयी सांगितले आणि हे ही  ठासून सांगितले की आमच्या उपासनी मॅडम पुढच्या वर्षीपासून आम्हाला इंग्रजी बोलायला शिकवणार आहेत त्यामुळे मी शाळा अजिबात बदलणार नाही. इतकेच नव्हे तर मला आश्चर्याचा आणखीन एक सुखद धक्का बसायचा बाकी होता. तो म्हणजे रोहिणीच्या आईचा मला फोन आला आणि या सगळ्याचा परिपाक म्हणजे रोहिणीची आई तिला माझ्या शाळेत ठेवायला तयार झाली. खरेच शिक्षकांचे भावविश्व कायम विद्यार्थ्यांभोवतीच फिरत असते नाही का?

इतके दिवस विद्यार्थी स्वतः कसा काय शिकेल? असं म्हणणारी मी वेध परिवाराशी जुळले काय आणि वेगवेगळ्या अध्ययन प्रक्रियेच्या पायऱ्यांशी सांगड घालत अध्ययन अनुभवांद्वारे समृद्ध झाले काय? एवढेच नाही तर "दिव्याने दिवा" लावावा तसा विद्यार्थी घडवण्यात यशस्वी ठरले आणि याचे सगळे श्रेय माझ्या वेध परिवाराला आहे. प्रत्येक माणसाकडे लिहिण्याची एक आत्मिक ऊर्जा असते. ती ऊर्जा ओळखून लिहिण्यास उद्युक्त करणाऱ्या वेध स्त्रोत नितीन मेमाणे सरांचे मी मन:पूर्वक आभार मानते.





**सौ प्रिया नितीन उपासनी**
**माहीममनपा माध्यमिक शाळा माहीम**
**फोन नंबर-९८३३७१७८३९**

# परिचय-वेध परिवाराचा

**आदरणीय शिक्षक बंधू आणि भागींनो वेध परिवाराविषयी आधी जाणून घेण्यासाठी खाली दिलेल्या लिंक वर क्लिक करावे.**

**[https://youtube.com/watch?v=xe_xoz7vMwI&feature=shared](https://youtube.com/watch?v=xe_xoz7vMwI&feature=shared)**

**वेध परिवार**



**Website ला अवश्य भेट द्या.**

**www.vedh.org.in**






# वेध परिवारामध्ये आपले स्वागत आहे.



# सुस्वागतम्!